Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4 मीरा नवसाळकर ISSN:-2230-7850

**Research Papers**

# रागगायनाच्या प्रस्तुतीकरणातील भावसौंदर्याचा आनंद

**मीरा नवसाळकर**
'सूरमणी', अमरावती

## प्रस्तावना :—

भावसौंदर्यामध्ये 'राग' हा महत्वाची भूमिका बजावित असतो. प्रस्तुतीकरणाचे महत्वाचे माध्यम म्हणजे राग होय. (प्रस्तुतीकरणाचे महत्वाचे माध्यम म्हणजे 'राग' होय.) प्रश्न उरतो तो की भावसौंदर्याचे मुख्य घटक कोणते ?कलाकाराने आपल्या अविष्कारात भावनिर्मिती करणे म्हणजे काय ?प्रस्तुतीकरणाचे आवश्यक अंग असलेले राग, ताल, व बंदिश हे तीन घटक आणि त्यातील अंगभूत वैशिष्ठयांच्या संयुक्तिक परिणामांचा परमानंद म्हणजे हया प्रस्तुतीकरणातील अत्युच्च अनुभूतीची प्रचिती होय.

भारतातील इतर कलाप्रकारांना जशी उज्वल परंपरा आहे तशीच अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. चार वेदांपैकी एक असलेल्या सामवेदामध्ये संगीताचा प्रामुख्याने अंतर्भाव आहे. जेंव्हा केंव्हा अभिजात शास्त्रीय संगीताचा संदर्भ येतो तेंव्हा 'राग' ही प्रमुख संकल्पना डोळयासमोर येते, आणि याच संकल्पनेला शास्त्रीय संगीताचे मर्मस्थान म्हणावे लागेल. 'राग' हा एक संस्कृत शब्द असून त्याचा शब्दशः अर्थ "रंगाची किंचीत छटा असलेला Colour hue" किंवा सौंदर्य अथवा माधुर्य असा आहे.1 संस्कृत ग्रंथकारांनी रागाची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे.

''योऽ यं ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूशितः ।
रंजको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः ।।

हयाचा अर्थ असा सांगता येईल की, 'स्वर' आणि त्यायोगे सौंदर्य प्राप्त झालेली ध्वनीची एक विशेष रचना की, जी जनचित्तांचे (मानवह्दयाचे) रंजन करु शकते, त्या ध्वनीरचनेला बुध्दीमान लोक राग असे म्हणतात. वरील श्लोकात रागाची दोन मुख्य लक्षणे दिली आहेत. पहिले, जनरंजनाची शक्ती त्यात असली पाहिजे आणि दुसरे स्वरवर्ण अलंकाराच्या (स्वर—वर्ण म्हणजे स्थायी, आरोही, अवरोही व संचारी) योगाने तो युक्त असला पाहिजे. तात्पर्य हेच की, रागाचा हया दोन लक्षणांपैकी एक म्हणजे लोकांच्या — रसिकांच्या ह्दयाला त्याने आनंद दिला पाहिजे आणि दुसरे की दोन रागांच्या मांडणीत नाद हा स्वरवर्णविभूशित असून त्यातून अलंकार प्रक्रिया दिसली पाहिजे.[2]

शास्त्रीय संगीत हे विविध थाट, राग, ताल हया घटक माध्यमातून व्यक्त केल्या जाते, तर कलावंत हया घटक व्याकरणाच्या मर्यादांचा स्विकार करुन त्यातून मिळणा—या स्वच्छंद अशा निर्मितीचा आनंद घेत असतो. सदर निर्मितीला आवाज, हे म्हत्वाचे माध्यम असून हया आवाजाच्या माध्यमाचा उपयोग, कलावंताच्या प्रस्तुतीकरणात 'स्वरांचे लगाव', हया सदराखाली करण्यात येतो. रागप्रकटीकरण म्हणजेच सौंदर्यपूर्ण पण स्वरश्रुतीयुक्त लयबध्द अशा विविध स्वररचनांची अलंकृत असलेल्या अशा भावार्थाची अभिव्यक्ती असते. मुळात, रागदारी संगीतात कोणताही प्रत्येक स्वर, हा सुसंस्कारीत असून या स्वरांना, मागच्या पुढच्या स्वरांचे जे कण किंवा मागच्या पुढच्या स्वरांची आस दिली जाते, त्यामुळेच स्वर माधुर्याची निर्मिती निरंतर होत असते. अशाप्रकारे कण, मींड, खटका, गमक, मुर्की, आंदोलन इत्यादी विविध क्रिया रागांमध्ये वापरल्या जातात व याच स्वर लगावांमुळे, रागांचा विस्तार करणे सोपे होते, तर स्वरलगावांचे सौंदर्य वैशिश्ठयपूर्ण होण्यास वरील घटक महत्वपूर्ण ठरतात.

रागाच्या संदर्भात विचार करतांना असे म्हणता येईल की, राग संकल्पनेकरीता भावात्मक बैठकीची आवश्यकता असते, कारण भावसौंदर्यामध्ये राग महत्वाची भूमिका बजावत असतो. प्रत्येक रागाला संवेदना असतात आणि हया संवेदनांचे प्रात्यक्षिक रागाच्या प्रस्तुतीकरणातून किंवा त्याच्या माध्यमातून करणे हा त्या प्रस्तुतीकरणातील मुख्य मुद्दा आहे. राग प्रकटीकरण म्हणजे सौंदर्यपूर्ण पण स्वरश्रुतीयुक्त लयबब्द अशा विशिष्ठ स्वररचनांनी अलंकृत झालेल्या अशा भावार्थाची अभिव्यक्ति असते. सादरीकरणासाठी मुख्यतः 1. राग 2. ताल आणि [3]. बंदिश हया तीन गोष्टींची आवश्यकता आहे. कारण राग म्हणजे विचार भावना, एक सौंदर्य आहे. राग एक असा रंग आहे की जो ऐकता येवू शकतो म्हणजेच ''आकृतीबंध नसणारे चित्र'' असे म्हणता येईल. रागाचे मूळ स्वरुप व प्रस्तुतीकरणानंतरच्या रागाचे स्वरुप हे पूर्णतः— कलावंताच्या कल्पकतेचे म्हणजे प्रतिभा, अनुभव तथा विव्दत्तेचे मनोरम असे शिल्प असते. प्रसिध्द विचारवंत क्रोचे यांच्या मते ''संगीत म्हणजे उत्स्फूर्त अभिव्यक्ति होय.[3] कारण प्रत्येक स्वराला त्याचा स्वतःचा निश्चित असा एक विवाक्षित भाव आहे, पण जेंव्हा त्या स्वरांबरोबर इतर स्वरांची सांगड घातली जाते तेंव्हा ही सांगड त्या भावनांचा अर्थ वेगळी करणारी ठरते. पुढे हयाच स्वरसंगती राग तयार करतात. हे स्वर रागात प्रस्तुत केल्याने त्या रागाचे भाव ते स्वर व्यक्त करतात. मूळतः राग आणि त्याबददलच्या अंगभूत भावना कलाकाराला माहित असतात आणि हयाच भावना ऐकणा—याच्या मनात उत्पन्न करण्याचे कसब हे कलावंताचे असते.

**Please cite this Article as :** *मीरा नवसाळकर , रागगायनाच्या प्रस्तुतीकरणातील भावसौंदर्याचा आनंद* **: Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)** ,

प्रस्तुतीकरणांचा मुद्दा लक्षात घेतांना खालील गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे की, ''संपूर्ण बैठक म्हणजे शेवटी ती एक रचनाकृती असते. ती रचनाकृती कलावंत कशी तयार करतो यावर बैठकीचे यश अवलंबून असते. प्रस्तुत रचनाकृतीतील घटक जेंव्हा परस्पर सुसंवादी असतात तेंव्हा ती आकृती श्रोत्यांच्या मनावर संकलीत परिणाम चांगला करते.''4 म्हणूनच प्रस्तुतीकरणापुर्वी एखाद्या राग संकल्पनेच्या अनुशंगाने मनात असलेल्या आकृतीबंधाचे विचार चलन आणि स्वराकृतीच्या माध्यमातून रसिकांपूढे ठेवण्याचा प्रयत्न हे सर्व प्रारंभीचे चरण म्हणून कलाकाराने ते स्विकृत करावयाचे असते. हया दृष्टीने रागाचे प्रमुख अंग म्हणून ख्यालगायकीची मांडणी ही त्याला अंगभूत असलेल्या विलंबित लयीच्या दृष्टीने महत्वाची ठरते. रागशास्त्र व्याकरणाचे पालन करुन स्वत़ंत्रपणे प्रस्तुतीकरण करणे हा ख्यालाचा परमोच्च बिंदु म्हणावा लागेल. रागवाचक भावछटा अत्यंत उत्स्फूर्तपणे, सूक्ष्म बदल करुन दर्शविण्यासाठी ख्याल हे अत्युत्तम माध्यम आहे, व त्याच अनुशंगाने त्यातील आलाप ताना, लय गमक प्रकार म्हणजे अल्पत्व, बहुत्व, कण, मींड, घसीट इत्यादी लगावांतर्गत येणा–या गोष्टींचा अत्युत्तम परिपोश असतो. हया व्यतिरिक्त रागाच्याच अंतर्गत येणा–या बंदिश या घटकाचा सुध्दा महत्वाचा वाटा प्रस्तुतीकरणात समजण्यात येतो. सादरीकरणात ज्या प्रमाणे विलंबित लयीच्या पार्श्वभूमीवर ख्यालगायनात अनेकविध स्वरवैशिष्ठंयाचे अविष्करण ठळकपणे करता येते त्याचप्रमाणे मध्य अथवा द्रुत लयीतील प्रस्तुतीकरणातसुध्दा बंदिशीतून, बंदिशीच्या स्वर योजनेतून, बंदिशीत असणा–या शब्दार्थातून, भावगायनाची एकप्रकारची भावस्थिती निर्माण होण्यासाठी, लयीचे वाढीव, अंग सादरीकरणात फारमोठी कामगिरी पार पाडित असतं. बंदिशीच्या विस्ताराचे घटक पाहू जाता हया विस्ताराचे दोन घटक आहेत. ते म्हणजे आलाप व तान. (लययुक्त आलाप व लयमुक्त आलाप) आलापाच्या संदर्भात स्वरविलास म्हणजे त्या रागाची खोली म्हणावी लागेल तर लय विलासाला रागाचा विस्तार म्हणावा लागेल. खरे तर आलापाला गायकाच्या भावूकतेचे प्रेषक म्हणावे लागेल म्हणूनच आलापाला संगीताचा भावपक्ष म्हटले आहे. हयाच लयीतील तानांचा मुददा ध्यानात घेता, त्यातील स्वर हा लयीशी बांधलेला असतो. व तान ही कलापक्षात मानली तर तानेचा संबंध चमत्कृती, बुध्दीशी जोडल्या जातो. अर्थात विलंबित लयीतच नव्हे तर सर्वच लयीत ही तानक्रिया बरोबरीच्या पटीत, दर्जात अथवा परिमाणात सादर करतांना तिच्यातील वैचित्र्यामुळे स्वरसंगतीचे पोत वाढविण्यास फायदेशीर तर ठरतेच पण तानप्रकाराची ही भुमिका प्रस्तुतीकरणात मुख्यरुपाने स्वरप्रवाहाच्या चैतन्याची साक्ष देते.

प्रस्तुतीकरणातील दुसरे महत्वाचे अंग म्हणजे ताल होय. ताल हया घटकावर चर्चा करतांना लयीचा विचार करणे अत्यावश्यक ठरते. कलावंताच्या अंतःकरणात ज्या भावनेचा उद्रेक झालेला असतो त्याचे अविश्करण सांगितिक शब्दांव्दारे लयीच्या अनुशंगाने होत असते. रागाचा जो स्थायीभाव असतो त्याला पोषक अशीच लय कलाकार स्विकारत असतो. तबल्याचा ठेका सुरु झाल्यावर प्रत्येकच स्वरगुच्छाची मांडणी ही अशी करावी लागते की प्रत्येक मागचा स्वर हा स्वतःची शोभा तर वाढवेलच पण पुढील स्वराची सुध्दा शोभा वाढविण्यास कारणीभूत ठरेल. यावेळी मात्र तो स्वर किती अल्पत्वाने लवायचा, किती बहुत्वाने म्हणायचा वरच्या स्वराचा कण द्यायचा कि खालच्या स्वराचा कण द्यायचा, ठेक्यामधील आघाताचा उपयोग किती प्रमाणात करावयाचा, हया सर्व घटकांची योजना कलावंत करीत असतो. सांप्रत सर्व योग्य गोष्टी साध्य करण्यासाठी ठेक्यामधील काही ठराविक सौंदर्यबिंदू ठरवून रचना करावी लागते. ही रचना करतांना सौंदर्याबिंदूपासूनचा प्रवास एका नियोजित जागेवर उत्कंठा वाढविणारा ठरतो, आणि हीच नियोजित जागा म्हणजे समेची जागा असते. जेंव्हा कलाकार सोंदर्यानिर्मिती व्हावी म्हणून मुददाम योजून काही हरकती घेतो तेंव्हा उत्स्फूर्तता ही राहत नाही परिणामी सादरी करणात कृत्रिमता येते. ''संगीत म्हणजे उत्स्फूर्त अभिव्यक्ती'' हे थोर विचारवंत क्रोचे यांचे मत अतिशय सार्थ ठरते.

भावनिर्मितीसाठी प्रस्तुतीकरणात अत्यंत महत्वाचा ठरलेला मुद्दा म्हणजे बंदिश होय. पं. वा. ह. देशपांडे यांच्या मते'' बंदिश ''हा शब्द संगीतात पुष्कळवेळा ''चीज'' पण त्यावेळी तो चिजेच्या ''रचनेला'' अथवा ''बांधणीलाच'' उुद्देशून वापरलेला असतो कारण चिजेच्या रचनेमध्ये हिच बंदिश असावी लागते5 'लय' या घटकाप्रमाणेच बंदिशीमध्ये सुध्दा प्रत्येकच मागच्या पुढच्या आवर्तनाची शोभा दाखविता दावविता म्हणजेच चढत्या क्रमाने अगदी शेवटच्या आवर्तनापर्यंत अविश्काराची परिसिमा गाठायची आणि अविश्काराचा परमोच बिंदू गाठायचा अशी योजनाबध्द मांडणी ''बंदिशीची'' असते.

प्रत्येक कलावंताचे प्रस्तुतीकरण हे बुध्दी प्रामाण्याचे एक जिवंत उदाहरण असेल किंवा नसेलही पण त्याची मूळ बैठक ही श्रोत्यांना आनंद देण्याबरोबरच संगीत अभ्यासकांना – विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक सुध्दा असते. कलावंताचा प्रत्येक स्वर एका अंतःकरणातून निघून दुस–याच्या अंतःकरणामध्ये प्रविष्ट व प्रतिष्ठीत होत असतो कारण या स्वरांना कालाकाराच्या तपश्चर्येचे व परंपरेच्या अनुभवाचे अस्तर लाभलेले असते. हया स्वरांवर सुयोग्य संस्कार होवून त्यातून त्याला संगीताच्या आचाराचे अंकुर फुटण्याची शक्यता असते, व त्यातूनच एखादया उदयोन्मुख कलावंताच्या उगमाची पहाट होण्यास मदत व्हावी हया सारखी कृतकृत्यता कोणती असू शकेल ?

### *निष्कर्ष*

***माझ्या मते :–***

1. प्रस्तुतीकरण्याकरीता स्वरांच्या सहायाने आधारभूत झालेल्या रंजक नादाचे ध्वनीशिल्प सर्व स्वर वर्णसहित असावयास पाहिजे.
2. प्रस्तुतीकरणाचे प्रमुख मर्मस्थान ''राग संकल्पना'' हे असावे.
3. राग प्रकटीकरणाची सौदर्यपूर्ण क्रिया ही त्या रागचलनाची व स्वर लगावाची संस्कारीत अभिव्यक्ती असावी लागते.
4 रागाबद्दलच्या अंगभूत भावना ऐकणा–यांच्या मनात संक्रमित करण्याकरिता उत्स्फूर्ततेची नितांत आवश्यकता लागते.
5. प्रस्तुतीकरणातील प्रत्येक आवर्तनाच्य उत्कर्श बिंदूची योजना ही लयीच्या माध्यमातून मधूर स्वरयुक्त बंदिशीच्या सहाय्याने करणे आवश्यक ठरते.

### *संदर्भ सूची*

संदर्भ क् 1. Dr. Archana M. Ambhore Raag Concept In Indian Music :- A Deliberation India Streams Research Journal (April 2012)
2. संदर्भ क् 2 'स्वरभास्कर' लेखक पं शंकर अभ्यंकर प्रकरण 9 'मैफल' पान क – 175 176
3. संदर्भ क 3 – 'स्वरभास्कर' लेखक पं. शंकर अभ्यंकर प्रकरण 9 'मैफल' पान क – 178
4. संदर्भ क 4 'स्वरभास्कर' – लेखक पं. शंकर अभ्यंकर प्रकरण 9 'मैफल' पान क – 177
5. संदर्भ क 5 'धरंदाज गायकी' – लेखक श्री. वा. ह. देशपांडे प्रकरण 4 'बंदिश' व अंतर्गत 'कायदे' पान क – 44

**Please cite this Article as :** *मीरा नवसाळकर , रागगायनाच्या प्रस्तुतीकरणातील भावसौंदर्याचा आनंद* **: Indian Streams Research Journal (JUNE ; 2012)**